# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### राज्यात सन २०१३-१४ या वर्षामध्ये पुर्वसंमती दिलेल्या शेततळ्यांचे शेतकरी अद्यापही अनुदानाच्या प्रतिक्षेत असल्याबाबत

**(१) १०४९ (२२-१२-२०१४). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१३-१४ या वर्षामध्ये पुर्वसंमती दिलेल्या ९४४६ शेततळ्यांपैकी २९१३ शेततळ्यांचे शेतकरी अद्यापही अनुदानाच्या प्रतिक्षेत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच राष्ट्रीय कृषी विकास योजनेमधून वैयक्तिक शेततळयांची योजना पुर्ववत सुरु करण्याची राज्यातील लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२५-०५-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) होय.

(३) प्रश्न भाग-१ बाबत प्रश्न उद्भवत नाही.

प्रश्न भाग-२ बाबत स्पष्ट करण्यात येते की, दि. २१ ऑगस्ट, २०१२ च्या शासन निर्णयान्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत वैयक्तिक लाभाची शेततळे ही योजना शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येत आहे. तसेच पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत वैयक्तिक शेततळी योजना राबविण्यात येते, व राष्ट्रीय कृषी विकास योजना सामुहिक शेततळ्यांसाठी वापरण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगांव शहर आणि परिसर (जि.नाशिक) येथे अवकाळी पावसामुळे डाळींब बागा आणि कांदयाचे पीक उध्वस्त झाल्याबाबत**

**(२) ३७२२ (२२-१२-२०१४). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव शहर आणि परिसर (जि,नाशिक) येथे अवकाळी पावसामुळे डाळींब बागा आणि कांदयाचे पीक उध्वस्त झाले असून तालुक्यातील १५ पेक्षा अधिक गावांचा समावेश या अवकाळी पावसामुळे त्रस्त झाला असल्याचे माहे नोव्हेंबर,२०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नुकसानग्रस्त शेतक-यांना आर्थिक मदत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०३-०६-२०१६) :** (१) होय.

(२) नोव्हेंबर व डिसेंबर, २०१४ या कालावधीत वादळी वारा, अतिवृष्टी, गारपीट व पुरपरिस्थिती यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना राज्य शासनाने दिनांक ०४/०२/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये विशेष पॅकेज मंजूर केलेले असून त्यानुसार शेतीपिकांसाठी रु.१०,०००/- प्रति हेक्टर, आश्वासति सिंचनाखालील शेती पिकांना रु.१५,०००/- प्रति हेक्टर व फळपिकांसाठी रु.२५,०००/- प्रति हेक्टर या दराने आर्थिक मदत जाहिर करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यासाठी कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बदलापूर पूर्व (जि.ठाणे) येथे राज्य परिवहन महामंडळाचा एस.टी. डेपो सुरु करण्याबाबत**

**(३) ५१७७ (१७-०७-२०१५). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदलापूर पूर्व (जि.ठाणे) येथे राज्य परिवहन महामंडळाचा एस.टी. डेपो सुरु करण्याचे प्रस्तावित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त एस.टी डेपोच्या बांधकामास सुरुवात करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, सदरहू बांधकाम केंव्हापर्यंत पूर्ण करणे अपेक्षित आहे,

(४) असल्यास, सदरहू एस.टी. डेपो लवकरात लवकर सुरु करण्याबबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाह केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप उक्त बांधकामास सुरवात केली नसल्यास विलंबाची कारण काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२८-०७-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) राज्य परिवहन महामंडळाने बदलापूर येथे सन १९९०-९१ साली ७५ फुट X २३ फुट आकारणाचे ३ फलाटांचे मिनीबसस्थानकाचे बांधकाम पूर्ण करुन वापरात आणले आहे. येथून जाणा-या व येणा-या ८६ फे-या चालनात आहेत. तसेच बसस्थानकावर प्रवाशी प्रतिक्षालय, स्त्री/पुरुष स्वतंत्र प्रसाधनगृह, चालक/वाहक विश्रांतीगृह, वाहतूक नियंत्रण कक्ष, विद्यार्थ्यांकरीता पास वितरीत करण्यासाठी स्वतंत्र खिडकी, इत्यादी सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. वाहनतळाचे डांबरीकरण केलेले आहे. बसस्थानकावर उपलब्ध सुविधा पुरेशा असल्याने बदलापूर येथे नविन आगार प्रस्तावित नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोयना धरणासाठी जमिनी घेतलेल्या प्रकल्पग्रस्तांना सोयीसुविधा पुरविणेबाबत**

**(४) ९०३७ (०७-०४-२०१५). श्री.संजय कदम (दापोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोयना धरणासाठी ज्या शेतकऱ्यांची जमिन प्रकल्पासाठी घेतली त्या-त्या प्रकल्पग्रस्तांचे १९६० मध्ये रायगड, ठाणे, रत्नागिरी, सातारा आणि सांगली जिल्हयात पुनर्वसन करण्यात आले त्यांना पुरेश्या प्रमाणात सोयी सुविधा देण्यात आल्या नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे कय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार सदर प्रकल्पग्रस्तांना सोयीसुविधा पुरविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०७-०५-२०१६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) कोयना जलविद्युत प्रकल्प टप्पा क्र.१ व २ मुळे सातारा जिल्हयातील बाधित प्रकल्पग्रस्तांचे सातारा, सांगली, रत्नागिरी, रायगड व ठाणे या पाच जिल्हयांमध्ये पुनर्वसन करण्यात आले असून, सदर जिल्हयामध्ये प्रकल्पग्रस्तांच्या एकूण १६१ अधिकृत व २५ अनधिकृत पुर्नसन वासहती आहेत. सदर वसाहतींपैकी सांगली, ठाणे व रत्नागिरी जिल्हयातील पुनर्वसित गावठाणांमध्ये १८ नागरी सुविधांपैकी धोरणानुसार देय मुलभूत नागरी सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. तर रायगड व सातारा जिल्हयातील पुनर्वसित गावठाणांमधील मुलभूत व उर्वरित नागरी सुविधांच्या अनुषंगाने प्राप्त प्रस्तावांबाबत तपासणीअंती प्रशासकीय मान्यतेची तसेच निधी उपलब्धतेची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मराठवाड्यातील पैठण-शहागड रस्त्यावर पैठण तालुका हद्दीतील जवळपास तेरा गावांना बसस्थानक, निवारा, प्रसाधनगृह नसल्याबाबत

**(५) ११३०८ (०६-०४-२०१५). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील पैठण-शहागड रस्त्यावर पैठण तालुका हद्दीतील जवळपास १३ गावे असून व या गावांची लोकसंख्या सुमारे चार हजारांपेक्षा अधिक असतांनाही या एकाही गावाला प्रवाशांसाठी ना बसस्थानक, ना निवारा, ना प्रसाधनगृह, अशी स्थिती निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी केली आहे काय त्यात काय आढळून आले,

(३) तद्नुसार शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१५-०९-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) पैठण शहागड रस्त्यावर पैठण तालुका हद्दीत जवळपास १३ गावे असून या गावांची लोकसंख्या सुमारे ४ हजारपेक्षा अधिक आहे. आपेगांव या ठिकाणी प्रवासी निवारा आहे. इतर गावे छोटी असून त्याठिकाणी रा.प.महामंडळाच्या मालकीची जागा नाही. तेथील प्रवासी चढ उतार पाहता प्रवासी निवाऱ्याची आवश्यकता तपासून त्यानूसार कार्यवाही करण्याचे आदेश राज्य परिवहन महामंडळास देण्यात आले आहेत.

---

## रिक्षा व टॅक्सी यांच्या किमान भाड्यात १ रुपया वाढ करण्याचा परिवहन विभागाने घेतलेला निर्णय

**(६) १६७३९ (०६-०८-२०१५). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रिक्षा व टॅक्सी यांच्या किमान भाड्यात १ रुपया वाढ करण्याचा निर्णय परिवहन विभागाने दिनांक १ जून, २०१५ पासून घेतला हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या वर्षभरात पेट्रोल व सीएनजी यांच्या किंमती मध्ये घसरण होत असतांनाही रिक्षा व टॅक्सी यांच्या किमान भाड्यात १ रुपया वाढ देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, रिक्षा व टॅक्सी यांच्या किमान भाड्यात केलेली वाढ कमी करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१३-०४-२०१६) :** (१) होय.

(२) टॅक्सी व रिक्षा यांचे भाडेदर फक्त इंधनाच्या दरानुसार ठरवले जात नसून भाडे परिगणना करता वाहनाचा विमा, मोटार वाहन कर, इंधनाची किंमत, ग्राहक निर्देशांक इत्यादी बाबींचा विचार करुन त्यानुसार भाडेदर निश्चीत केले जातात. सदर भाडेवाढ मुंबई महानगर प्रदेश परिवहन प्राधिकरणाच्या ठरावानुसार करण्यात आली असून भाडेवाढ अंमलात आणण्यापूर्वी मा.मुंबई उच्च न्यायालसास अवगत करण्यात आले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे-मुलुंड दरम्यान रिक्षा हद्दीच्या वादावर तोडगा काढणे व इतर समस्यांबाबत निर्णय घेण्याबाबत

**(७) १७८६९ (०८-०८-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे-मुलुंड दरम्यान रिक्षा हद्दीच्या वादावर तोडगा काढणे व इतर समस्यांबाबत निर्णय घेण्यासाठी ठाणे येथील शासकीय विश्रामगृहामध्ये दिनांक ११ मे, २०१५ रोजी मा.गृह राज्यमंत्री तसेच प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या समवेत बैठक घेण्यात आलेली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी समस्याचे थोडक्यात स्वरूप काय आहे व त्यानुसार आतापर्यंत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे.

(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) प्रकरणी लवकरात लवकर निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भात शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१३-०४-२०१६) :** (१) या विषयावर राज्यमंत्री (गृह) यांच्या मंत्रालयीन दालनात माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये बैठक घेण्यात आली होती.

(२) व (३) मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाच्या मार्च, २००८ मध्ये झालेल्या बैठकीत प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, मुंबई व प्रादेशिक परिवहन प्राधिकरण ठाणे यांचे क्षेत्र मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाच्या क्षेत्रात विलीन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, त्यामुळे टॅक्सी व ऑटोरिक्षा संपूर्ण मुंबई महानगर क्षेत्रात मुक्तपणे प्रवासी वाहतूक करु शकतात. त्यानुसार ठाणे व मुलुंड दरम्यान ऑटोरिक्षा मुक्तपणे वाहतूक करु शकत असल्याने हद्दीचा वाद मिटला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बनावट रिक्षाचालक व त्यांच्या वाढत्या गुन्हेगारीबाबत**

**(८) २०१०६ (१७-०८-२०१५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मीरा-भाईंदर, जि.ठाणे येथे शहरात परवाना व बॅच नसतानाही बेकायदा पध्दतीने रिक्षा चालविल्या जात असल्याचे माहे एप्रिल, २०१५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत विविध रिक्षाचालक संघटनांनी तक्रारी केल्या होत्या त्यानंतर मागील काही दिवसात ८५ रिक्षा जप्त करण्यात आल्या असून इतरही रिक्षा जप्त करण्यात येत आहे हे पाहता सदरहू बेकायदा रिक्षा चालकांवर शासन आवश्यक कारवाई करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३१-०५-२०१६) :** (१) व (२) एप्रिल, २०१५ मध्ये मिरा-भाईंदर येथे ऑटोरिक्षा तपासणी मोहिम राबविण्यात आली. या तपासणी दरम्यान आवश्यक कागदपत्रे सादर करु न शकलेल्या एकूण १४७ रिक्षाचालकांच्या रिक्षा अटकावून ठेवल्या होत्या. त्यापैकी १२६ ऑटोरिक्षा मुक्त करण्यात आल्या आहेत. या मुक्त केलेल्या रिक्षांमध्ये एकही बेकायदा रिक्षा आढळून आली नाही. उर्वरित २१ प्रकरणे वाहनमालकांनी संपर्क न साधल्याने प्रलंबित आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोडोली (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) येथील बस स्थानकाची इमारत ५० वर्षापूर्वीची असल्याबाबत**

**(९) २१८३२ (०६-०८-२०१५). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोडोली (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) येथील बस स्थानकाची इमारत ५० वर्षापूर्वीची आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारत पूर्णपणे नादुरुस्त व धोकादायक बनलेली आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रवाशांची मोठया प्रमाणात गैरसोय होत असल्याबाबतच्या तक्रारी महामंडळाकडे प्राप्त झालेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, नवीन इमारत बांधण्याविषयीच्या प्रस्तावाला मान्यता देण्याबाबत तसेच आर्थिक तरतुद करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२३-११-२०१५) :** (१), (२), (३) व (४) कोडोली येथे सन १९६६ साली प्रवाशी निवारा पध्दतीचे बसस्थानक बांधण्यात आलेले आहे. सदर बसस्थानकावर सध्या उपहारगृह, वाहतूक नियंत्रण कक्ष, पार्सल कक्ष, आरक्षण कक्ष, पिण्याचे पाणी, लाईट, पंखे, प्रतिक्षालयात आसन व्यवस्था, प्रसाधनगृह, डांबरीकरण, वाहनतळ इत्यादी सुविधा आहेत, सदरचे बसस्थानक वेळोवेळी दुरुस्ती करण्यात आले असल्यामुळे सध्याचे बसस्थानक सुस्थितीत आहे.

कोडोली येथे राज्य परिवहन महामंडळाची ०.५७.६५ हेक्टर क्षेत्र जागा आहे. कोडोली येथे नव्याने सुसज्य असे बसस्थानक बांधण्याबाबत श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर विधानसभा सदस्य, शाहुवाडी यांनी दिनांक १९.०१.२०१५ रोजी मा. मंत्री (परिवहन) यांना पत्र दिलेले आहे.

कोडोली बसस्थानकावरुन होणाऱ्या प्रवाशी वाहतूकीच्या आधारे निकष ठरवून नवीन बसस्थानकाचा आराखडा व अंदाजपत्रक तयार करण्याची बाब राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर कार्यवाहीखाली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हिंगोली जिल्हयात रेती वाहतूक करणारे ट्रक व टिप्पर क्षमतेपेक्षा दुप्पट ते तिप्पट वजनाची रेती वाहतूक करत असल्याबाबत**

**(१०) २२६३९ (०६-०८-२०१५). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयात रेती वाहतूक करणारे ट्रक व टिप्पर वाहनांच्या व रस्त्यांच्या क्षमतेपेक्षा दुप्पट ते तिप्पट वजनाची रेती वाहतूक करत असल्यामुळे अनेक ठिकाणी रस्ते खचत असून चांगले रस्ते खराब होत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वाहनांकडे उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी हेतुपुरस्पर दुर्लक्ष करित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, क्षमतेपेक्षा दुप्पट ते तिप्पट वजनाची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर परिवहन विभागाकडून काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१३-०४-२०१६) :** (१), (२) व (३) भार क्षमतेपेक्षा जास्त मालाची वाहतूक करणाऱ्या वाहनांचा शोध घेण्यासाठी उप-प्रादेशिक परिवहन कार्यालय, हिंगोली यांच्याकडील वायुवेग पथकामार्फत नियमितपणे तपासणी करुन कारवाई केली जाते.

एप्रिल, २०१४ ते मार्च, २०१५ या कालावधी तपासलेल्या १८६२ वाहनांपैकी दोषी आढळलेल्या ६८५ वाहनांवर व एप्रिल, २०१५ ते ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत तपासलेल्या १७५४ वाहनांपैकी दोषी आढळलेल्या ३५१ वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई उपनगरातील अंधेरी पश्चिम येथील व्ही पी रोड व जे पी रोडवरील अनधिकृत ऑटोरिक्षांची स्थानिक नागरीकांनी केलेल्या तक्रारीबाबत**

**(११) २३५२४ (०६-०८-२०१५). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील अंधेरी पश्चिम येथील व्ही पी रोड व जे पी रोडवरील अनधिकृत ऑटोरिक्षांची स्थानिक नागरिकांनी केलेल्या अनेक तक्रारी गेल्या अडीच वर्षापासून अंधेरी आरटीओ व डी एन नगर वाहतूक विभागास प्राप्त झालेल्या असल्याचे माहे मे, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिसर अनधिकृत ऑटोरिक्षांपासून मुक्त करण्यास विलंब लावणा-या डी.एन.नगर वाहतूक विभाग व अंधेरी आर.टी.ओ. च्या अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, याबाबत विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१३-०४-२०१६) :** (१) होय, स्थानिकांच्या तक्रारी प्राप्त झाल्याची बाब खरी आहे. अंधेरी पश्चिम येथील व्ही. पी रोड व जे पी रोड येथे प्रादेशिक परिवहन कार्यालय (मुंबई पश्चिम) यांचेकडील वायुवेग पथकाने वाहतूक पोलिस, डी.एन.नगर यांच्यासमवेत जानेवारी, २०१४ ते ऑक्टोबर, २०१४ या कालावधीत केलेल्या ऑटोरिक्षांच्या तपासणीमध्ये एकूण १३८८ रिक्षांपैकी दोषी आढळलेल्या २१६ रिक्षांवर कारवाई करण्यात आली. तसेच नोव्हेंबर, २०१४ ते ऑगस्ट, २०१५ या कालावधीत केलेल्या तपासणीमध्ये दोषी आढळलेल्या २०८ रिक्षांवर आवश्यकतेप्रमाणे जप्ती/दंड वसूलीची कारवाई करण्यात आली.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शासनाने शेतकऱ्यांना दिलेले आर्थिक सहाय्य विदर्भात अद्यापही बऱ्याच शेतकऱ्यांना बँकामार्फत प्राप्त झालेले नसल्याबाबत**

**(१२) २४४७० (०६-०८-२०१५). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे हिवाळी सत्रात शासनाने शेतकऱ्यांना तातडीची मदत म्हणून रुपये ४५०० प्रति हेक्टर दिलेले आर्थिक सहाय्य विदर्भात अद्यापही बऱ्याच शेतकऱ्यांना बँकामार्फत प्राप्त झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू आर्थिक सहाय्य शेतकऱ्यांना तातडीने म्हणजे एक महिन्याच्या आत देणे बंधनकारक असताना बँकाकडून दिरंगाई होत असल्याचे निदर्शनास आले आहे त्यास जिल्हाधिकारी, तहसलिदार इ.शासकीय अधिकारी व बँक अधिकारी जबाबदार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित दोषी अधिकाऱ्यांची चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशी अंती शेतकऱ्यांना आर्थिक मदत तातडीने देण्याबाबतचे शासनाचे धोरण असतानाही मदत देण्यास दिरंगाई करणा-या जबाबदार असणा-या अधिकाऱ्यांविरुध्द अथवा संबंधित बँकाविरुध्द शासनाने काय कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (११-०५-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चोपडा (जि.जळगांव) तालुक्यातील येथील पिकांवर होणा-या रोगाबाबत**

**(१३) २८३३२ (१३-०१-२०१६). श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चोपडा तालुक्यातील जि.जळगांव पूर्व भागात १४ गावांमध्ये केळी पिकावर करपा या बुरशीजन्य रोग पसरल्याचे नुकतेच माहे सप्टेंबर २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त बुरशीजन्य रोगावर नियंत्रण व संरक्षण तसेच रासायनिक औषधांची फवारणी करण्याबाबत तसेच नुकसान झालेल्या शेतक-यांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१३-०४-२०१६) :** (१) होय.
(२) बुरशीजन्य रोगावर नियंत्रणासाठी शासनामार्फत ९० टक्के अनुदानावर बुरशीनाशकांचा पुरवठा करण्यात आला आहे. तसेच केळी करपा क्षेत्रिय सहाय्यक यांचेमार्फत गावात गावबैठक घेवून बागेची स्वच्छता ठेवणे, कंद प्रक्रिया करणे व फवारणी करणेबाबत मार्गदर्शन करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना बससाठी मोफत सुविधा देणेबाबत**

**(१४) २८४२६ (१८-०१-२०१६). श्री.छगन भुजबळ (येवला), श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर जिल्ह्यातील विद्यार्थीनीने बसच्या पाससाठी २६० रुपये नसल्यामुळे आत्महत्या केल्याची घटना दिनांक २४ ऑक्टोंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शालेय व महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना बससाठी मोफत सुविधा देण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२१-०४-२०१६) :** (१) होय.

लातूर जिल्ह्यातील जढाळा गावातील कु.स्वाती विठ्ठल पिठले या विद्यार्थ्यांनीनी कॉलेजला जाण्यासाठी एस.टी च्या पाससाठी रुपये २६० नाहीत म्हणून आत्महत्या केल्याची बातमी दि. २६.१०.२०१५ रोजीच्या दै.महाराष्ट्र टाईम्स या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली.

(२) मराठवाडा प्रदेशातील औरंगाबाद, बीड, उस्मनाबाद, जालना, लातुर, नांदेड, परभणी या सात विभागातील शैक्षणिक तसेच तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना १०० टक्के सवलत देण्याचा निर्णय राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर स्वयंस्फुर्तीने घेण्यात येवून दिनांक ०१ नोव्हेबर, २०१५ पासून सदर योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्याच्या परिवहन आयुक्त कार्यालयाने पारदर्शी व दलालमुक्त काम करण्याकरिता सारथी ही नवीन ऑनलाईन यंत्रणा विकसीत केल्याबाबत

**(१५) २९८१९ (२०-०१-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या परिवहन आयुक्त कार्यालयाने पारदर्शी व दलालमुक्त काम करण्याकरिता ऑनलाईन अपॉईंटमेंटकरिता योजना सुरू केली परंतु ऑनलाईन अपॉईंटमेंटकरिता आरटीओ साईटच उघडत नसल्याच्या तक्रारी नागरीकांच्या असल्याचे माहे १५ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागरीकांची कामे ऑनलाईनवर पारदर्शक व सुरळीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०२-०५-२०१६) :** (१) होय.

(२) नागरिकांची कामे ऑनलाईन पध्दतीने पारदर्शक व सुरळीत करण्याबाबत राष्ट्रीय सूचना केंद्र यांच्यामार्फत सारथी ४.० ही नवीन यंत्रणा अनुज्ञाप्तीकरिता विकसित करण्यात आली असून, प्रादेशिक परिवहन कार्यालय, कोल्हापूर येथे डिसेंबर, २०१५ मध्ये प्रायोगिक तत्वावर सुरु करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद येथील संभाजी नगरातील रत्नपूर येथे अलिगड मुस्लिम विदयापिठाचे केंद्र उभारण्याचा प्रस्ताव**

**(१६) ३०१८५ (२३-१२-२०१५). श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील संभाजी नगरातील रत्नपूर येथे अलिगड मुस्लिम विदयापिठाचे केंद्र उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विचाराधीन प्रस्तावावर शासनाचा निर्णय झाला आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-०५-२०१६) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात माहे एप्रिल ते मे, २०१५ या कालावधीत ८८ जणांचा मृत्यू एस.टी अपघातात झाल्याबाबत**

**(१७) ३०१९९ (१८-०१-२०१६). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे एप्रिल ते मे, २०१५ या कालावधीत एस.टी अपघातात ८८ जणांचा मृत्यू ९०४ जण जखमी झाल्याचे तसेच अमरावतीच्या माहुली गावात एस.टी.अपघातात १२ वर्ष वयाच्या मुलीचा मृत्यू झाल्याची घटना माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती मृत व जखमी झालेल्यां व्यक्तींना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२१-०४-२०१६) :** (१) होय.

अमरावतीच्या माहुली गावातील अपघातात १२ वर्ष वयाच्या मुलाचा मृत्यू झालेला आहे.

(२) व (३) अमरावती जिल्हयातील माहुली येथील अपघातग्रस्त बसच्या कर्तव्यावरीलचालक / वाहक यांना निलंबित करण्यात येऊन, चालक श्री. संजय ज्ञानेश्वर गोफणे यांचेविरुद पोलीस

स्टेशन माहुली जहॉगीर येथील भा.दं.वि. कलम २७९, ३०४(अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तसेच अपघातग्रस्त राज्य परिवहन प्रवाशांना राज्य परिवहन नियमानुसार "पी" फॉमद्वारे अपघात नुकसान भरपाई अदा करण्याची बाब राज्य परिवहन महामंडळाच्या कार्यवाहीखाली असून अपघातात मृत झालेल्या मुलाच्या कुटुंबियांना राज्य परिवहन नियमानुसार रुपये तीन लाख अपघात नुकसान भरपाई राज्य परिवहन महामंडळाद्वारा देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोकण किनारपट्टीवरील चक्रीवादळाचे धोके कमी व्हावेत यासाठी**
**निवारा केंद्र उभारण्याचा प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत**

**(१८) ३०४१२ (२२-०१-२०१६). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकण किनारपट्टीवरील चक्रीवादळाचे धोके कमी व्हावेत यासाठी निवारा केंद्र उभारण्याच्या प्रकल्पाला ३९८ कोटी जागतिक बँकेने मंजूर केले आहेत, हे खरे आहे काय,
(२) परंतु राज्य शासनाने अनुमती दिलेली नसल्याने हा प्रकल्प प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकल्पातून रायगड जिलह्यातील नऊ गावांमध्ये चक्रीवादळ निवारा केंद्र बांधण्यात येणार असून या संदर्भातील प्रस्ताव जिल्हा प्रशासनास सादर केला असतानाही या प्रकल्पास अद्यापी मंजूरी देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्य शासनाने उक्त प्रकल्पास अनुमती न देण्यामागची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१०-०५-२०१६) :** (१) होय.
(२) नाही.
(३) व (४) जागतिक बँकेच्या पथकाने फेब्रुवारी, २०१६ मध्ये सुचविल्यानुसार रायगड जिल्हयातील सद्य:स्थितीत तीन चक्रीवादळ निवारा केंद्र बांधण्याचे प्रस्तावित असून, तपशिलवार प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याचे काम सुरु आहे.

---

**लातूर जिल्हयातील उदगीर शहरात बस आगाराची इमारत बांधण्याबाबत**

**(१९) ३०९१४ (२०-०१-२०१६). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर जिल्हयातील उदगीर हे शहर तीन राज्यातील आगाराशी जोडलेला असून या आगारात असलेली इमारत ही पूर्णता मोडकळीस आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बस आगाराची इमारत बांधणीसाठी लोकप्रतिनिधींनी माहे सप्टेंबर २०१५ वा त्यादरम्यान मागणी केली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, लातूर जिल्ह्यातील उदगीर शहरात बस आगाराची इमारत बांधणीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२१-०४-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.

लोकप्रतिनिधींनी माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये बसस्थानकांच्या इमारत बांधणीसाठी मागणी केलेली आहे.

(३) बसस्थानकाच्या इमारतीचे नुतनीकरणे करण्याच्या कामास रु. १.०० कोटी इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चिखली (जि.बुलढाणा) तालुक्यातील बसस्थानक सुसज्ज व स्वच्छ ठेवण्याबाबत**

**(२०) ३१०८६ (२०-०१-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली (जि.बुलढाणा) तालुक्यात राज्य परिवहन महामंडळाच्या बसने प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या सुविधेसाठी चिखली शहराच्या मध्यवर्ती भागात बसस्थानक सुरू केले, परंतु सदरील बसस्थानक हे विविध समस्यांनी ग्रासले असल्याने येथील प्रवासी त्रस्त झाले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी प्रवाशांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रारी करूनही राज्य परिवहन महामंडळ प्रशासन दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बसस्थानक सुसज्ज व स्वच्छ ठेवण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२१-०४-२०१६) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) बुलढाणा विभागांतर्गत चिखली येथे प्रवाशांच्या सेवेसाठी ९ फलाटांचे बसस्थानक सर्व आवश्यक सुविधांसह बांधण्यात आले आहे. दि.०२.१०.२०१५ ते दि.०१.१०.२०१६ या कालावधीकरीता बहुद्देशिय मागासवर्गीय सामाजिक संस्था चिखली यांची बसस्थानकाची स्वच्छता करण्यासाठी नियुक्ती केली असून सदर संस्थेद्वारे बसस्थानकाची स्वच्छता करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील एसटी बस स्थानकांमध्ये असलेल्या एसटी कॅटीन आणि स्टॉल धारकांनी दंड आकारणी रद्द करण्याबाबत केलेली मागणी**

**(२१) ३१३१० (१८-०१-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य परिहवन महामंडळाच्या २९ जुलैच्या परिपत्रकानुसार राज्यातील एसटी बस स्थानकांमध्ये असलेल्या एसटी कॅटीन आणि स्टॉल आदी वाणिज्य आस्थापनाच्या परवाना कालावधीतील टप्पा संपुष्टात आलेल्या परवान्याचे नुतनीकरण करण्यात येऊ नये असे आदेश काढण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदेशामुळे परवानाधारकांवर उपासमारीची वेळ आल्यामुळे वाणिज्य आस्थापनाच्या नुतनीकरणांवर आणलेली बंदी उठविण्यासह वाढीव जागा न वापरतासुध्दा लाखो रुपये दंड आकारणी रद्द करण्यात यावी अशा मागणीचे निवेदन एसटी कॅटीन व स्टॉल परवानाधारक असोसिएशने मा.परिवहन मंत्री, पालकमंत्री, स्थानिक लोकप्रतिनिधी व खासदार यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने कोणत निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाचर कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२१-०४-२०१६) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) वाणिज्य आस्थापनांचा परवाना कालावधीतील टप्पा संपुष्ठात आल्यानंतर त्यांच्या परवान्यांचे नुतनीकरण न करणेबाबत राज्य परिवहन महामंडळाने दि.२९.०७.२०१५ च्या पत्रान्वये विभागांना देण्यात आलेल्या सुचना दि.२५.०१.२०१६ च्या पत्रान्वये रददबातल केलेबाबत सर्व विभागांना कळविण्यात आले आहे. त्याचप्रमाणे ज्या आस्थापनाधारकांनी अनधिकृतपणे अतिरिक्त जागा वापरल्याबाबत सुरक्षा व दक्षता खात्याने अहवाल सादर केला होता, त्या आस्थापनांबाबत वस्तुनिष्ठ परिस्थिती लक्षात घेऊन नैसर्गिक न्याय तत्वावर तपासणी करणे व वसुलीची रक्कम ठरवुन पुढील कार्यवाही करण्याकरिता विभागीय पातळीवर विभाग नियंत्रक, विभागीय लेखा अधिकारी, विभागीय अभियंता, विभागीय सुरक्षा अधिकारी यांची संयुक्त समिती स्थापन करण्यात आली आहे व त्यांचेकडून वसुलीची रक्कम अंतिम करणेबाबत कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बोरीवली पश्चिमेतील महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाचे नॅन्सी बस आगार अत्यंत दुरवस्थेत असल्याबाबत**

**(२२) ३२३७८ (१८-०१-२०१६). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरीवली पश्चिमेतील महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाचे नॅन्सी बस आगार अत्यंत दुरवस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याची पहाणी वा चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती प्रवाशांच्या सोयीसाठी सदर आगाराची दुरुस्ती व डागडुजी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२१-०४-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) नॅन्सी कॉलनी बोरीवली (पूर्व) येथे बसस्थानक कार्यान्वीत असून ते सुस्थितीत आहे. बसस्थानकाची रंग-रंगोटी, आवाराचे डांबरीकरण करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील (ता.गडहिंग्लज) लिंगनूर नेसरी व्हाया हेळेवाडी मार्गे नेसरी ते गडहिंग्लज अशी एसटी सुरु करण्याबाबत**

**(२३) ३२५५२ (१८-०१-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यातील (ता.गडहिंग्लज) लिंगनूर नेसरी व्हाया हेळेवाडी मार्गे नेसरी ते गडहिंग्लज अशी एसटी सुरु करण्याची मागणी आगार प्रमुख, गडहिंग्लज यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी व नागरीकांनी सातत्याने करुनही अद्याप एसटी सेवा सुरु करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर एसटी सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२१-०४-२०१६) :** (१), (२) व (३) राज्य परिवहन महामंडळाच्या गडहिंग्लज अगारामार्फत दि.०२.०२.२०१६ पासून लिंगनूर नेसरी व्हाया हेळेवाडी मार्गे नेसरी ते गडहिंग्लज या मार्गावर बस फेऱ्या सुरु करण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील चोवीस गावांना भूस्खलनाचा धोका असल्याबाबत**

**(२४) ३२८९५ (१८-०१-२०१६). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हा-जिल्हाधिकारी पुणे यांच्या अध्यक्षतेखाली पुरनियंत्रण आणि आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण समितीची बैठक दिनांक ५ मे, २०१५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्ह्यातील भूस्खलन होण्याची शक्यता असलेल्या २४ गावांचा गावनिहाय स्वतंत्र आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करावा, अशी सुचना जिल्हाधिकारी पुणे यांनी दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यतील गावांचे सर्वेक्षण केले होते, त्यातुन जिल्ह्यातील २४ गावांत भूस्खलन होण्याची शक्यता स्पष्ट झाली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पुणे जिल्ह्यातील पुरप्रवण २४ गावाचा आराखडा तयार झाला आहे काय,
(५) असल्यास, आराखड्याची माहिती लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांना उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१०-०५-२०१६) :** (१) होय.
(२) होय.
(३) होय, हे अंशत: खरे आहे. सर्वेक्षणाअंती पुणे जिल्ह्यामध्ये भूस्खलन होण्याची शक्यता असलेल्या गावांची संख्या २४ नसून २३ आहे.
(४) होय.
(५) व (६) दरड कोसळणाऱ्या २३ गावांचा गांव आपत्ती व्यवस्थापन आराखंडा अद्यावत करुन गावांतील धोकादायक ठिकाणे, लोकसंख्या विषयक माहिती निवारे, स्थानिक, अशासकीय सामाजिक संस्था, आपत्ती दरम्यान संपर्क साधाणाऱ्या व्यकतीचे संपर्क क्रमांक हॉटेल, शेती विषयक माहिती, आपत्तीचा इतिहास, आपत्ती प्रवण भाग दर्शविणारा नकाशा, हॉस्पीटल, उपलब्ध असलेले साहित्य इ. गोष्टींचा समावेश असणारा आराखडा तयार करण्यात आला आहे.

---

**अंजनगाव सुर्जी तालुक्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे संत्रा पुनरुजीवन योजणेचे ४८ लक्ष वाटप झाले असून ६९ लक्ष रुपये बाकी असल्याबाबत**

**(२५) ३३७२२ (१५-०१-२०१६). श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंजनगाव सुर्जी तालुक्यातील संत्रा उत्पादक शेतक-यांचे संत्रा पुनरुज्जीवन योजनेचे ४८ लक्ष वाटप झाले असून ६९ लक्ष रुपये वाटपाचे अजून बाकी आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वंचित शेतकऱ्यांना ६९ लक्ष अनुदान वाटपाबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०७-०५-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) अंजनगाव सुर्जी तालुक्यात सन २०१४-१५ मध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजने मधून बहुवार्षिक फळपिके वाचविण्यासाठी करावयाच्या उपाययोजना अंतर्गत रु. ५७.७० लाख व सन २०१५-१६ मध्ये एकात्मिक फलोत्पादन विकास अभियाना अंतर्गत पुनरुज्जीवन या घटकासाठी रु. ३.४८ लाख असा एकूण रु. ६१.१८ लाख निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### उमरगा तालुक्यातील (जि.उस्मानाबाद) दाळिंब-नारंगवाडी-माडज येथील बसथांब्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(२६) ३३७७६ (१८-०१-२०१६). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरगा तालुक्यातील (जि.उस्मानाबाद) दाळिंब-नारंगवाडी-माडज येथील बसथांब्याची दुरवस्था झालेबाबत व सदरच्या बसथांब्याची दुरुस्ती करणेबाबत उमरगा-लोहारा येथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक २९/०८/२०१२ रोजी लेखी निवेदनाद्वारे विनंती केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२१-०४-२०१६) :** (१) होय.

(२) दाळींब येथील प्रवाशी निवारा रस्ता रुंदीकरणात बाधीत होत असून महामार्गाच्या रुंदीकरणानंतर संबंधित विभागाकडून पुनस्थापित करण्याविषयीची बाब राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर कार्यवाही खाली आहे.

नारंगवाडी येथील प्रवासी निवाऱ्याची जानेवारी, २०१५ मध्ये डागडुजी करण्यात आली आहे.

माडज येथील प्रवाशी निवाऱ्याची दुरुस्ती आवश्यक असून महामंडळाची आर्थिक स्थिती बिकट असल्यामुळे प्रवासी निवाऱ्याची दुरुस्ती करण्यासाठी स्थानिक आमदार/खासदार यांचेकडे स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत निधीतून निधी उपलब्ध करुन देण्याची बाब राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर कार्यवाही खाली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### उमरगा तालुक्यातील (जि.उस्मानाबाद) उमरगा-येणेगूर व मुरुम येथील बसस्थानाकांच्या इमारतीची दुरुस्ती करणेबाबत

**(२७) ३३७८१ (१८-०१-२०१६). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरगा तालुक्यातील (जि.उस्मानाबाद) उमरगा-येणेगूर व मुरुम येथील बसस्थानकांच्या इमारतीची दुरवस्था झालेल्या कारणाने व बसस्थानकात पाणी, वीज, रस्ते आदी सुविधांचा अभाव असलेल्या कारणाने प्रवाशांची गैरसोय होत असलेबाबत व सदरच्या बसस्थानकांची दुरुस्ती करणेबाबत उमरगा-लोहारा येथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक २९ ऑगस्ट, २०१२ रोजी लेखी निवेदनाद्वारे विनंती केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बसस्थानकांची दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२१-०४-२०१६) :** (१) होय.

(२) उमरगा बसस्थानकामध्ये पिण्याच्या पाण्याची व विद्युत व्यवस्था आहे. तसेच संपूर्ण बसस्थानकाच्या डांबरीकरणाचे अंदाजपत्रक मंजूर झाले असून निविदा प्रक्रिया चालू आहे.

येणेगुर बसस्थानकात पिण्याच्या पाण्याची व विद्युत व्यवस्था आहे. वाहनतळाची डागडूजी करण्यात आली असून बसस्थानक इमारत सुस्थितीत आहे. तसेच डांबरीकरणाच्या कामास प्रशासकीय मान्यता दिली असून निविदा प्रक्रिया सुरु आहे.

मुरुम बसस्थानकात पिण्याच्या पाण्याची व विद्युत व्यवस्था आहे. तसेच वाहनतळ सुस्थितीत आहे. महामंडळाची आर्थिक स्थिती बिकट असल्यामुळे निधीच्या उपलब्धनेनुसार बस स्थानक इमारतीचे नुतनीकरण करण्याची बाब राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर कार्यवाहीखाली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला जिल्ह्यातील शहापूर पाटबंधारे (ता.अकोट) तसेच उमाप्रकल्प ता. मुर्तिजापूर या प्रकल्पासाठी संपादीत केलेल्या जमीनीचा मोबदला कमी दिला जात असल्याबाबत

**(२८) ३३८६३ (२७-०१-२०१६). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील शहापूर पाटबंधारे (ता.अकोट) तसेच उमाप्रकल्प ता. मुर्तिजापूर या प्रकल्पासाठी संपादीत केलेल्या जमीनीचा मोबदला नविन भुसंपादन अधिनियम २०१३ मधील तरतुदीनुसार देय मोबदल्यासाठी ग्रामीण भागासाठी लावावयाचा गुणांक २ ऐवजी १.५ निश्चित करुन प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना कमी मोबदला दिला जात आहे, हे खरे आहे काय,

(२) उक्त प्रकरणी शेतकऱ्यांनी पाटबंधारे विभाग/भुसंपादन अधिकारी यांच्याकडे २ गुणांक लावून आर्थिक मोबदला देण्यात यावा अशा मागणी संबंधाने खात्याने नकारात्मक भुमिका घेतली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी नविन भुसंपादन अधिनियमानुसार निर्माण झालेल्या पेच/संभ्रम दुर करण्यासाठी जिल्हाधिकारी अकोला यांनी पत्र क्रमांक १०८/अका-१/प्र.अ./कावि-५०४-२०१५ दिनांक २६ जून, २०१५ अन्वये मार्गदर्शन मागितले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासन नियमांचे अचुक आकलन न करणाऱ्या अकार्यक्षम व दोषी अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२७-०४-२०१६) :** (१) हे खरे नाही.

संपूर्ण अकोला जिल्ह्यासाठी प्रादेशिक योजना लागू झालेली असल्याने शहापूर पाटबंधारे (ता.अकोट) तसेच उमाप्रकल्प (ता.मूर्तिजापूर) या प्रकल्पांसाठी महाराष्ट्र शासनाच्या दिनांक २६.५.२०.१५ रोजीच्या अधिसूचनेमध्ये नमूद केल्यानुसार गुणांक १.५ लागू करण्यात आलेला आहे.

(२) हे खरे नाही.
(३) जिल्हाधिकारी, अकोला यांनी त्यांच्या दिनांक २०.६.२०१५ रोजीच्या पत्रान्वये शासनाकडे गुणांकाबाबत मार्गदर्शन करण्याची विनंती केली होती. त्यानुसार शासनाने प्रसिध्द केलेल्या अधिसूचनांच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, अकोला यांना शासनपत्र क्र.विकाक-०२/२०१२६/सं.क्र.९७/अ-२, दिनांक ११.२.२०१६ अन्वये देण्यात आल्या आहेत.
(४) नविन भूसंपादन कायदा, २०१३ च्या अनुषंगाने तयार करण्यात आलेली नियमावली तसेच अनुषंगिक अधिसूचना, शासन निर्णय यामध्ये दिलेल्या निर्देशानुसारच प्रकरणी कार्यवाही करण्यात आलेली असल्याने संबंधीतांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खडकपूर्णा प्रकल्पग्रस्त (जि.बुलडाणा) शेतक-यांनी केंद्र सरकारचे अनुदान घेतलेले आहे अशा शेतकऱ्यांना लाभ देण्याच्या मागणीबाबत**

**(२९) ३४२७७ (१६-०१-२०१६). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खडकपूर्णा प्रकल्पग्रस्त (जि.बुलडाणा) शेतक-यांनी केंद्र सरकारचे अनुदान घेतलेले आहे अशा प्रकल्पग्रस्त शेतक-यांना कलम २८ अंतर्गत लाभ देता येणार नाही असे भूसंपादन अधिका-यांकडून तोंडी कळविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खडकपूर्णा प्रकल्पग्रस्तांचे प्रकरण क्र. २७९०९१ एकच असतांना खडकपूर्णा प्रकल्पग्रस्तांनी अनुदान घेतलेले असतांनाही कलम १८ अंतर्गत मा.जिल्हा सत्र न्यायालय बुलडाणा यांनी आदेश पारित करुन संबंधित अनुदान प्राप्त लाभार्थ्यांना लाभ दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरण एकच असतांना एकाच प्रकल्पातील सर्व प्रकल्पग्रस्तांना वेगवेगळा न्याय देण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मा.न्ययालय कलम १८ अंतर्गत लाभ देऊ शकते तर अनुदान प्राप्त शेतकऱ्यांना अनुदान न देण्यामागची कारणे काय आहे,
(५) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(६) तद्‌नुसार सदर प्रकरणी शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०७-०५-२०१६) :** (१) नाही.
(२) होय.
(३) नाही. जर कास्तकारांनी पुनर्वसन अनुदानाची उचल केली असल्यास म.शा. महसूल व वन विभाग शासन ठराव दि. १५.१२.१९८३ व म.शा. महसूल व वन विभाग शा.नि. ०३.०५.१९८८ अन्वये कलम १८ व २८ चे लाभ देय नाहीत. तथापी काही प्रकल्पग्रस्तांनी न्यायालयात दावा दाखल असतांना, कलम १८ अतंर्गत केलेला दावा मागे घेतला असून यापुढे कलम २८ (अ) अंतर्गत वाढीव मोबदल्यासाठी अर्ज दाखल करणार नाही असे खोटे प्रतिज्ञापत्र संबंधित

कास्तकारांनी संबंधित भूसंपादन अधिकारी यांचे कार्यालयास सादर करुन पुनर्वसन अनुदानाचा मोबदला तसेच, मा.न्यायालयातून कलम १८ अंतर्गत वाढीव मोबदल्याचा लाभही घेतला असल्याचे उप विभागीय अधिकारी, सिंदखेड राजा यांचे निदर्शनास आले आहे.

(४) जर कास्तकारांनी पुनर्वसन अनुदानाची उचल केली असल्यास म.शा. महसूल व वन विभाग शासन ठराव दि. १५.१२.१९८३ म.शा. महसूल व वन विभाग शा.नि. ०३.०५.१९८८ अन्वये कलम १८ व २८ चे लाभ लाभ देय नाहीत. शासनाच्या धोरणाप्रमाणे पुनर्वसन अनुदानाकरीता अर्जदार ज्यावेळी अर्ज सादर करता त्यावेळी त्यांनी प्रतिज्ञापत्र दाखल केलेले असते की, पुनर्वसन अनुदानाचा लाभ घेतला तर कलम १८ अंतर्गत मा.न्यायालयात दाद मागणार नाही. त्याअनुषंगाने शेतकऱ्यांनी पुनर्वसन अनुदानाचा लाभ घेतला असल्यास त्यांना कलम १८ अन्वये वाढीव मोबदला अनुज्ञेय होत नाही.

(५) होय. काही कास्तकारांनी पुनर्वसन अनुदानाचा लाभ घेऊनही, कलम १८ अन्वये मा.न्यायालयाकडून वाढीव मोबदला घेतला असल्याचे उप विभागीय अधिकारी, सिंदखेड राजा यांना आढळून आले आहे.

(६) पुनर्वसन अनुदान घेऊनही मा.न्यायालयातून कलम १८ अंतर्गत लाभ घेतलेल्या कास्तकारांविरुध्द नियमानुसार कायदेशीर कार्यवाही सुरु असून अतिरिक्त वाटप करण्यात आलेल्या पुनर्वसन अनुदानाची रक्कत वसुल करण्यात येत आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगांव जिल्हयातील शेतक-यांना पीक विमा संरक्षण नाकारल्याबाबत**

**(३०) ३५५८२ (१३-०१-२०१६). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पीक वीमा योजनेत सहभागी झालेल्या शेतक-यांनी कर्जातील पैसे विमा हप्त्यासाठी परस्पर कापून दिले मात्र शासनाने अदयापही हप्ता न दिल्याने जळगांव जिल्हयातील शेतकऱ्यांना विमा संरक्षण नाकारल्याची बाब माहे सप्टेंबर २०१५ च्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने पिक विमा योजनेचा आपला हप्ता न भरण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, पिक विमा योजनेचा शासनाचा हप्ता तातडीने भरण्यासंदर्भात तसेच पिक विमा योजनेचे संरक्षण शेतक-यांना देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२५-०४-२०१६) :** (१), (२) व (३) जळगाव जिल्ह्यामध्ये राष्ट्रीय कृषि विमा योजना भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत राबविण्यात आलेली होती. जळगाव जिल्ह्यातील ९८२७५ शेतकरी रुपये २३.९८ कोटी विमा हप्ता भरुन योजनेत सहभागी झालेले होते. त्यापैकी ९७५२३ शेतकरी नुकसान भरपाई पात्र ठरलेले असून त्यांना रु.७३.८० कोटी

इतकी नुकसान भरपाई भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत मंजूर करण्यात आलेली आहे. योजनेच्या निकषांनुसार राज्य शासनाचा हिस्सा भारतीय कृषि विमा कंपनीकडे वर्ग करण्यात आलेला असून लाभार्थी शेतकऱ्यांना नुकसान भरपाई अदा करण्यासाठी रक्कम शेतकऱ्यांच्या संबंधित बँकांकडे वर्ग करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य परिवहनचे इगतपुरी (जि. नाशिक) बसस्थानक**
**मुंबई - नाशिक महामार्गालगत हलविण्याबाबत**

**(३१) ३५७३८ (१३-०१-२०१६). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहनचे इगतपुरी (जि. नाशिक) बसस्थानक हे मुंबई - नाशिक महामार्गापासून २ ते ३ कि. मी. अंतरावर असून बस स्थानक मुंबई - नाशिक महामार्गालगत हलविल्यास आगाराचे उत्पन्न वाढून लोकांना मोठ्या प्रमाणावर वाहतुकीची सोय उपलब्ध होणार असल्याने बस स्थानक मुंबई - नाशिक महामार्गालगत हलविण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा. परिवहन मंत्री यांचेकडे दि. २६/०८/२०१५ रोजी वा त्या सुमारास लेखी पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१८-०६-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) इगतपूरी हे आगार गेल्या १० वर्षापासून तोट्यात असून आगाराचा संचित तोटा रु. १३२.०० लाख इतका आहे.

सदरचे बसस्थान मुंबई-नाशिक महामार्गालगत झाल्यास नवीन उत्पन्नाची साधने निर्माण होतील, त्यामुळे आगाराची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास हातभार लागणार आहे. परंतु महामार्गालगत बसस्थानकासाठी महामंडळाच्या मालकीची जागा उपलब्ध नाही. सदर बसस्थानकासाठी जागा उपलब्ध करुन घेणेसाठी तात्काळ कार्यवाही करावी असे आदेश शासनाने महामंडळास दिलेले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील ६० वर्षावरील शेतकऱ्यांना व शेत मजूरांना निवृत्तीवेतन देण्याबाबत**

**(३२) ३६३१३ (१५-०१-२०१५). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ६० वर्षावरील शेतकऱ्यांना व शेत मजूरांना दरमहा दोन हजार रुपये निवृत्तीवेतन देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, सदरहू प्रस्तावाची अंमलबजवणी किती कालावधीत होणे अपेक्षित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२६-०२-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केज तालुक्यातील ज्या शेतक-यांनी मागील दोन-तीन वर्षात ठिबक सिंचन केले होते अशा शेतक-यांना अनुदान मिळाले नसल्याबाबत**

**(३३) ३६८०२ (१५-०१-२०१६). श्रीमती संगीता ठोंबरे (केज) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केज तालुक्यातील ज्या शेतक-यांनी मागील दोन-तीन वर्षात ठिबक सिंचन केले होते अशा शेतक-यांना अनुदान मिळाले नसून हे अनुदान तात्काळ सदर शेतक-यांना वाटप करावे अशी मागणी निवेदनाव्दारे करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनाची दखल घेत केज तालुका कृषी अधिकारी यांनी लवकरात लवकर अनुदान संबंधित शेतक-यांच्या खात्यावर वर्ग करण्यात येईल असे आश्वासन दिले असल्याचे माहे सप्टेबर, २०१५ च्या दुस-या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, अनुदान संबंधित शेतक-यांच्या खात्यावर वर्ग करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०७-०४-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) सन २०१३-१४ या वर्षात एकूण ८८८ प्रलंबित प्रकरणांपैकी उपलब्ध निधीच्या मर्यादेत ६९९ शेतकऱ्यांना अनुदान वाटप करण्यात आलेले आहे. निधी उपलब्धतेनुसार उर्वरित १८९ शेतकऱ्यांना अनुदानाचे वाटप करण्यात येईल.

सन २०१४-१५ मधील ११३४ लाभार्थ्यांपैकी उपलब्ध निधीच्या मर्यादेत ४४९ लाभार्थ्यांना अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कापूस पिकांची पाहणी करणाऱ्या जिल्हास्तरीय तपासणी समितीने दिलेल्या अहवालावर शेतकऱ्याकडून रोष व्यक्त करण्यात येत असल्याबाबत**

**(३४) ३७१०० (२२-१२-२०१५). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील केळापूर तालुक्यातील खैरगाव दे, वाघोली व तातापुर येथील शेतकऱ्यांच्या शेतातील बि.टी. कपाशीची पिके वाळली असल्याने शेतकऱ्यांनी याबाबत कृषी विभागाकडे तक्रार केल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुका कृषी अधिकाऱ्यांनी सदर शेतकऱ्यांच्या शेतातील कापूस पिकांची पाहणी केल्यानंतर तक्रारकर्त्या शेतकऱ्यांच्या शेतातील कापूस पिकांची पाहणी करण्याकरिता जिल्हास्तरीय तपासणी समितीचे अधिकारी आले असता या समितीतून जो अहवाल देण्यात आला आहे त्याने शेतकऱ्याकडून रोष व्यक्त करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना कोणती मदत करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०७-०४-२०१६) :** (१) होय.

(२) होय.

(३) होय, शेतकऱ्यांना तक्रारींच्या अनुषंगाने कृषि विद्यापीठ समितीने दिनांक २८/०८/२०१५ रोजी व जिल्हास्तरीय तपासणी समितीने दिनांक ०८/१०/२०१५ रोजी यवतमाळ जिल्ह्यातील केळापूर तालुक्यातील गावातील पिकांची पाहणी केली. सदर समित्यांनी पाहणीअंती पुढीलप्रमाणे निष्कर्ष काढला. वातावरणातील अधिक तापमान, पावसातील खंड, जमिनीतील ओलाव्याची कमतरता यामुळे कपाशीचे पिकास अजैविक ताण (abiotic stress) बसला असून परिणामी बी.टी. कपाशीची पिके वाळली, तसेच वाळण्याच्या अवस्थेत होती. त्यामुळे कपाशीच्या उत्पादनात घट होऊन शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झालेले आहे. सदर समित्यांची शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शनही केले.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, अमरावती आगारातील साहित्याचा पुरवठा तसेच नविन बसेस पुरविण्याबाबत**

**(३५) ३७१९५ (२०-०१-२०१६). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, अमरावती आगारातील जवळपास ५०% बसेस भंगार झाल्या असून त्यासाठी साहित्याची पुर्तता होत नसल्याने सयुक्त एस.टी. कर्मचारी समितीने १० डिसेंबर, २०१४ रोजी कामबंद आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या अनुषंगाने साहित्याचा पुरवठा तसेच नविन बसेस अमरावती आगाराला पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२१-०४-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.

अमरावती आगारातील नादुरुस्त बसेसची संख्या १०% पेक्षा कमी आहे. कर्मचाऱ्यांनी आंदोलन केले होते ही बाब खरी आहे.
(२) अमरावती आगाराकरिता गत ३ वर्षामध्ये ३१ व चालू वर्षी माहे जुलै, २०१५ पर्यंत ८ अशा एकूण ३९ नविन वाहनांचा पुरवठा करण्यात आला असून याच कालावधीत १६ बसेस मोडीत काढल्या आहेत.

महामंडळाच्या धोरणाप्रमाणे प्रवासी वाहने मोडीत काढण्याचे आयुर्मान १० वर्षावरुन ८ वर्षापर्यंत भांडवली उपलब्धतेनुसार टप्याटप्याने अंमलात आणण्याचे धोरण निश्चित करण्यात आलेले आहे. मात्र, राज्य परिवहन, अमरावती आगारातील बसेसचे सरासरी आयुर्मान ४ वर्षे ९ महिने इतके आहे.

आगारास सामानाचा पुरवठा नियमित केला जात असून आगारांमध्ये वाहनांची देखभाल नियोजित कार्यक्रमांतर्गत दैनिक, दशदिनीय, त्रैमासिक डॉकिंग अशा प्रकारे करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### भोकरदन तालुक्याती शेतकरी शेड-नेट च्या अनुदानापासून वंचीत असल्याबाबत

**(३६) ३७८०८ (१३-०१-२०१६). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोकरदन (जि.जालना) तालुक्यातील शेतक-यांना २०१३-२०१४ मध्ये मंजूर परंतू कामे पुर्ण न झालेल्या शेड-नेट च्या कामाचे कार्यारंभ रद्द करण्यात आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आदेशात सुमारे २० शेतक-यांनी कार्यारंभ आदेश काढण्यापूर्वी शेड-नेट चे काम पुर्ण केले असल्याचे तपासणीमध्ये आढळून आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त २० शेतकरी अनुदानापासून वंचीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू शेतक-यांना अनुदान मिळणे बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०७-०५-२०१६) :** (१), (२) व (३) नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सन २००८ ते २०११ या कालावधीत मुखेड तालुका कृषी अधिकारी कार्यालयामार्फत ठिबक व तुषार संचाचे अनुदानात झालेला गैरव्यवहार**

**(३७) ३७८७० (१५-०१-२०१६). डॉ.तुषार राठोड (मुखेड), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २००८ ते २०११ या कालावधीत मुखेड तालुका कृषी अधिकारी कार्यालयामार्फत २५४० शेतकऱ्यांना ठिबक व तुषार संचाचे अनुदान देण्यात आले. त्यापैकी कित्येक शेतकऱ्यांना त्यांचे नावे ठिबक व तुषार संच उचलण्यात आल्याचे माहितच नाही. या शेतकऱ्यांच्या नावावर परस्पर ठिबक व तुषार संच उचलून मोठया प्रमाणावर अनियमितता व गैरव्यवहार झाला आहे असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) याच कार्यालयामार्फत सन २०१०-११ व २०११-१२ या कालावधीत गतिमान पाण लोट विकास कार्यक्रम या योजनेच्या अंमलबजावणीत ४ गावामधील कामामध्ये अनियमितता व गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०३-०५-२०१६) :** (१) हे खरे नाही.तथापि श्रीमती लक्ष्मीबाई नामदेव मंगनाळे यांचे नावे श्रीमती कविता बालाजी मंगनाळे व श्री.बालाजी मंगनाळे यांनी खोटे अंगठे लावून परस्पर अनुदान घेतल्याबाबत श्री.गुणवंत नामदेव मंगनाळे, निवळी, ता.मुखेळ यांनी तक्रार केली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने तालुका कृषी अधिकारी, नायगाव यांच्यामार्फत चौकशी केली असता परस्पर अनुदान घेतले नसल्याचे आढळून आले. तसा लेखी जबाबत श्रीमती लक्ष्मीबाई नामदेव मंगनाळे यांनी दिलेला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पूसद व उमरखेड येथील राज्य परिवहन मामंडळाच्या आगारास नवीन बसेस पुरविण्याबाबत**

**(३८) ३७९३४ (३०-०१-२०१६). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पूसद व उमरखेड आगारातील ग्रामिण भागात पाठविण्यात येणाऱ्या एस.टी. बस चालविण्या लायक नसतानाही पाठविण्यात येऊन ग्रामीण भागातून प्रवासी वाहतूक करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) सदर आगारातील अनेक बसेसची दुरवस्था झाली असल्याने चालक व प्रवाशांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तात्काळ प्रवाशाच्या दृष्टीने नवीन बसेस पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२१-०४-२०१६) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) सन २०१३ ते डिसेंबर, २०१५ या कालावधीत यवतमाळ विभागातील पुसद आगारास १९ व उमरखेड आगारास १६ नवीन बसेसचा पुरवठा करण्यात आला आहे. तसेच पुसद आगारातून १५ व उमरखेड आगारातून ७ बसेस राज्य परिवहन नियमानुसार मोडीत काढण्या आल्या आहेत.

पुसद व उमरखेड आगाराकरिता राज्य परिवहन महामंडळाच्या धोरणानुसार नवीन वाहनांचा पुरवठा उपलब्धतेनुसार करण्यात येतो, तसेच मुदतबाह्य झालेली वाहने मोडित काढण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कृषि महाविद्यालयांना अनुदान मिळण्याबाबत**

**(३९) ३८९१८ (२१-१२-२०१५). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कृषि महाविद्यालयांना विना अनुदानित तत्वावर मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील कृषि महाविद्यालयांची प्रगती होण्यासाठी त्यांना अनुदान देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाच्या धोरणाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, सदर धोरणांची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१२-०२-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वादळ, पूर, भूकंप अशा आपत्ती निवारणासाठी स्वतंत्र योजना तयार करण्यास आलेले अपयश**

**(४०) ३९३४५ (१५-०१-२०१६). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वादळ, पूर, भूकंप अशा आपत्ती निवारण्यासाठी स्वतंत्र योजना तयार करण्यात राज्यस्तरीय आणि जिल्हास्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणांना अपयश आल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१५ च्या तिसऱ्या सप्ताहात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निसर्ग निर्मित आपत्तींची प्रभावीपणे सामना करण्यासाठी शासनाने आजतागायत कोणत्या योजना आखल्या आहेत वा आखण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२८-०३-२०१६) :** (१) नाही.
(२) व (३) महाराष्ट्र आपत्ती धोके व्यवस्थापन कार्यक्रम राज्यात राबविण्यात येत आहे. त्या अंतर्गत राज्याचा तसेच, सर्व जिल्ह्यांचे आपत्ती व्यवस्थापन आराखडे तयार करण्यात आले आहेत. सदर आराखडे दर वर्षी अद्यावत करण्यात येतात.

नैसर्गिक व मानव निर्मित आपत्ती विषयी शासकीय अधिकारी, पोलिस, डॉक्टर, पत्रकार, स्वयंसेवी संस्था, सर्वसामान्य जनता यांना प्रशिक्षण देण्यात येते. विविध स्तरावर आपत्ती व्यवस्थापक विषयक रंगीत तालीम घेण्यात येतात. वेगवेगळ्या माध्यमातून आपत्ती विषयी जनजागृती करण्यात येते.

---

**दुष्काळग्रस्त गाव म्हणून जाहीर केलेल्या गावांना दुष्काळी सुविधा देण्याबाबत**

**(४१) ३९९६४ (२८-०४-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरेगाव (जि.सातारा) तालुक्याच्या उत्तर भागातील अनेक गावांचा समावेश दुष्काळी भागात करण्यात आला, तथापि दुष्काळी गाव म्हणून ज्या सुविधा मिळणे आवश्यक आहे, त्या सुविधांपासून सदर गावे अद्यापही वंचित असल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती सदर गावांना दुष्काळी सुविधा तातडीने पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०३-०६-२०१६) :** (१) सन २०१५-१६ च्या खरीप हंगामातील हंगामी पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी असलेल्या सातारा जिल्ह्यातील ३४३ गावांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला असून त्यापैकी कोरेगाव तालुक्यातील ७६ गावांचा समावेश असून सदर गावांना विविध उपाययोजना लागू करण्यात आलेल्या आहेत.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केंद्राच्या दुष्काळ पॅकेजपासून कापूस उत्पादकांना वगळण्यात आल्याबाबत**

**(४२) ३९९६५ (२८-०४-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने राज्यातील दुष्काळ निवारण्यासाठी दिनांक २९ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास जाहीर केलेल्या तीन हजार ५० कोटीच्या पॅकेज वाटपाबाबत काढण्यात आलेल्या शासन निर्णयात, कापसाव्यतिरिक्त अन्य कोरडवाहू पीक उत्पादन खातेदारांमध्ये हा निधी वितरीत करण्यात यावा असे नमूद करण्यात आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे कापूस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कापूस उत्पादक शेतकऱ्यांना मदत करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०३-०६-२०१६) :**(१), (२) व (३) शासन निर्णय दिनांक २.३.२०१६ अन्वये खरीप २०१५ मधील औरंगाबाद, नाशिक, अमरावती व नागपूर विभागातील कापूस अमरावती व नागपूर विभागातील सोयाबिन व नागपूर विभागातील धान पिकाच्या नुकसानी संदर्भात विशेष मदत जाहिर करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्रातील २४ हजार ३०६ गावांना दुष्काळी गावांच्या यादीत समावेश करुन सदर गावांना दुष्काळाबाबत आवश्यक मदत करणेबाबत**

**(४३) ४१८०९ (२८-०४-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.अजित पवार (बारामती), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनाना टाळून महाराष्ट्रातील २४ हजार ३०६ गावे दुष्काळाच्या मदतीतून वगळण्याचे माहे जानेवारी २०१६ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनासस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावे वगळण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर गावांचा पुन्हा सर्व्हे करुन सदर गावांचा दुष्काळी गावांच्या यादीत समावेश करुन सदर गावांना दुष्काळाबाबत आवश्यक मदत करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०३-०६-२०१६) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात राष्ट्रीय कृषी विस्तार व तंत्रज्ञान अभियान अंतर्गत कृषी यांत्रिकिकरण उपअभियानातून शेती औजाराचा लाभ देण्याबाबत

**(४४) ४२४२० (२८-०४-२०१६). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात राष्ट्रीय कृषी विस्तार व तंत्रज्ञान अभियान अंतर्गत कृषी यांत्रिकिकरण उपअभियानातून शेती औजाराचा लाभ देण्यासाठी दीड महिन्यापूर्वी निश्चित केलेल्या उद्दिष्टात दीड हजार औजारांची कपात करण्यात आल्यामुळे मोठया प्रमाणात शेतकरी औजारांपासुन वंचित राहणार असल्याचे माहे जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, औजारांची करण्यात आलेली कपात रद्द करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२३-०५-२०१६) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाने कृषीअभियांत्रिकीकरण उप अभियानाअंतर्गत एप्रिल, २०१५ मध्ये केंद्र राज्य हिश्याचे प्रमाण ५०:५० नुसार, केंद्र व राज्य हिश्श्यापोटी प्रत्येक रु. १५.९६ कोटी, याप्रकरणे एकूण रु.३१.९२ कोटी रकमेच्या कार्यक्रमास मंजूरी दिली होती. त्यानुसार सदर उप अभियानाअंतर्गत राज्यासाठी ८,५६५ भौतिक लक्षांक देण्यात आला होता.

नोव्हेंबर, २०१५ मध्ये केंद्र : राज्य हिश्याच्या प्रमाणात ६०:४० असा बदल करण्यात आल्याचे केंद्र शासनाने कळविले. तथापि, केंद्राच्या मंजूर अनुदानात बदल होणार नाही, असेही केंद्र शासनाने कळविले, बदललेल्या केंद्र व राज्य हिश्याच्या प्रमाणानुसार केंद्र हिश्याच्या रु. १५.९६ कोटी निधीच्या प्रमाणात, राज्य हिस्सा रु. १०.६४ कोटी झाला. अशाप्रकारे एकूण कार्यक्रम २६.६० कोटी रकमेचा झाला. उपलब्ध अनुदानाच्या मार्यादत लक्षांकामध्ये घट करुन ७,०४३ सुधारित भौतिक लक्षांक निश्चित करण्यात आले.

सदर योजना केंद्र पुरस्कृत असल्यामुळे, केंद्र शासनाने मंजूर कलेल्या आर्थिक मर्यादेत योजना राबविणे क्रम प्राप्त असते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्र वक्फ बोर्डाच्या औरंगाबाद कार्यालयातील निलंबित लिपिक याच्यावर करावयाची कारवाई

**(४५) ४३४८० (२८-०४-२०१६). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र वक्फ बोर्डाच्या औरंगाबाद कार्यालयातील निलंबित लिपिक इफ्तेखारुल्लाह बेग यांच्या सीइओचे स्टॅप तसेच श्रीमंताच्या बेकायदेशीर पणे विकलेल्या जमिनीच्या फायली, कोर शपथपत्र, बोर्डाच्या सदस्यांचे लेटरहेड त्यांच्या कपाटात आढळून आले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती संबंधितावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२६-०५-२०१६) :** (१) होय.
(२) व (३) श्री.बेग इफ्तेखार, लघुलेखक यांच्या विरुध्द विभागीय चौकशी करुन चौकशी अहवालातील निष्पन्नानंतर त्यांच्या विरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांना दि. १६.२.२०१६ च्या शासन पत्रान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## दुष्काळामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना उत्पादन आधारित मदत देण्याबाबत

**(४६) ४६८२० (२८-०४-२०१६). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मागील वर्षी दुष्काळामुळे बाधित शेतकऱ्यांना १३ मे, २०१५ च्या शासन निर्णयनुसार मदत मिळणार असल्याचे शासनाने सांगितल्याने शेतकऱ्यांच्या हातात अत्यंत तुटपुंजी रक्कम पडणार असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांना उत्पादन आधारित मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०३-०६-२०१६) :** (१), (२) व (३) शासन निर्णय दिनांक ९.११.२०१५ अन्वये सन २०१५-१६ च्या खरीप हंगामातील हंगामी पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असलेल्या १५७४७ तसेच दिनांक २३.४.२०१६ च्या शासन निर्णयान्वये ५० पैशापेक्षा कमी पैसेवारी आलेल्या ११८६२ गावांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला असून विविध उपाययोजना जाहीर करण्यात आल्या आहेत.

शासन निर्णय दिनांक १०.३.२०१६ अन्वये सन २०१५-१६ च्या रब्बी हंगामातील हंगामी पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असलेल्या १०५३ गावांमध्ये तसेच दिनांक २७.४.२०१६ च्या शासन निर्णयान्वये ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी आलेल्या १९९१ गावांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला असून विविध उपाययोजना जाहीर करण्यात आल्या आहेत.

---

**सोलापूर आणि अहमदनगर जिल्ह्यात दुष्काळ जाहिर केल्याबाबत**

**(४७) ४७०५१ (२८-०४-२०१६). श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर आणि अहमदनगर जिल्ह्यात दुष्काळ जाहीर केल्याची घोषणा शासनाने दि. १ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घोषणेनुसार सदर दोन्ही जिल्ह्यातील दुष्काळ निवारणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०३-०६-२०१६) :** (१) होय.
(२) शासन निर्णय दिनांक १० मार्च, २०१६ अन्वये सन २०१-१६ सालातील रब्बी पिकांच्या हंगामी पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असलेल्या अहमदनगर जिल्ह्यातील ४०८ व सोलापूर जिल्ह्यातील ६४५ गवांमध्ये दुष्काळ जाहरी करण्यात आला आहे. तसेच शासन निर्णय दिनांक २७ एप्रिल, २०१६ अन्वये सन २०१५-१६ सालातील रब्बी पिकांच्या अंतिम पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असलेल्या अहमदनगर जिल्ह्यातील ९५३ व सोलापूर जिल्ह्यातील १०३८ गवांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात येऊन सवलती लागू करण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात सातत्याने उद्भवणा-या दुष्काळी परिस्थितीवर उपाययोजना करण्यासाठी तालुका आणि जिल्हापातळी पर्यत समित्या स्थापन

**(४८) ४८६५१ (२८-०४-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सातत्याने उद्भवणा-या दुष्काळी परिस्थितीवर उपाययोजना करण्यासाठी तालुका आणि जिल्हापातळी पर्यत समित्या स्थापन करण्याचा निर्णय माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या आठवड्याच्या सुमारास घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समित्यांची रचना, कार्यकक्षा, व अधिकार काय आहेत,

(३) असल्यास, प्रत्यक्षात समित्या स्थापन करण्यात आले आहेत काय,

(४) असल्यास, समित्या स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०३-०६-२०१६) :** (१) होय.

(२) व (३) समितीची रचना ग्राम स्तरीय, तालुका स्तरीय जिल्हा स्तरीय समिती अशी आहे. सदर समितीच्या कार्यकक्षा वेगवेगळ्या असून समितीचे अधिकार खालीलप्रमाणे आहेत.

१) ग्राम स्तरीय समितीने त्यांना त्यांच्या कार्यकक्षेत दिलेल्या कामाचा आढवा ग्रामस्तरीय समितीत घेऊन त्याबाबत अहवाल वजा शिफारस तालुका स्तरीय समितीस सादर करावा.

२) तालुका स्तरीय समितीने त्यांना त्यांच्या कार्यकक्षेत दिलेल्या कामाचा आढावा, नियोजन, नियंत्रण व अंमलबजावणी करणे तसेच ग्रामस्तरीय समितीने दिलेला अहवाल वजा शिफारस तालुका स्तरीय समितीत विचारात घेऊन त्याबाबत अहवाल वजा शिफारस जिल्हा स्तरीय समितीस सादर करावा.

३) जिल्हा स्तरीय समितीने त्यांना त्यांच्या कार्यकक्षेत दिलेल्या कामाचा आढावा, घेणे, तसेच तालुका स्तरीय समितीने सादर केलेला अहवाल वजा शिफारस जिल्हास्तरीय समितीत विचारात घेऊन त्याबाबत अहवाल वजा शिफारस विभागीय आयुक्तास सादर करावा.

विभागीय आयुक्त यांनी त्यांच्या अधिपत्याखाली सर्व जिल्हास्तरीय समितीच्या अहवाल विचारात घेऊन त्याअनुषंगाने सर्वकष अहवाल तथा प्रस्ताव शासनास सादर करावा.

(४) व (५) सदर समितीमधील शासकीय सदस्यानी नेमणूक करण्यात आली असून गाव पातळीवरील समितीचे अध्यक्ष सरपंच आहेत, तालुका पातळीवरील तसेच जिल्हा पातळीवरील समितीचे अध्यक्ष अशासकीय सदस्य असून अशासकीय सदस्याची निवड प्रक्रिया सुरु आहे.

---

**दुष्काळ परिस्थितीवर मात करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा व निधीची तरतूद करण्याबाबत**

**(४९) ४९०३१ (२८-०४-२०१६). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सरासरीपेक्षा ३४ टक्के पाऊस कमी पडल्याने विशेषत: मराठवाड्यात सर्वात कमी पाऊस पडल्याने दुष्काळाचे सावट निर्माण झाले आहे याबाबत शासनाने सर्व्हेक्षण केले आहे काय,

(२) असल्यास, सर्व्हेक्षणाचा अहवालानुसार शासनाने दुष्काळ परिस्थितीवर मात तसेच स्वतंत्र यंत्रणा व निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०३-०६-२०१६) :** (१), (२) व (३) शासन निर्णय दिनांक ९.११.२०१५ अन्वये सन २०१५-१६ च्या खरीप हंगामातील हंगामी पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असलेल्या १५७४७ तसेच दिनांक २३.४.२०१६ च्या शासन निर्णयान्वये ५० पैशापेक्षा कमी पैसेवारी आलेल्या ११८६२ गावांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला असून विविध उपाययोजना जाहीर करण्यात आल्या आहेत.

शासन निर्णय दिनांक १०.३.२०१६ अन्वये सन २०१५-१६ च्या रब्बी हंगामातील हंगामी पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असलेल्या १०५३ गावांमध्ये तसेच दिनांक २७.४.२०१६ च्या शासन निर्णयान्वये ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी आलेल्या १९९१ गावांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला असून विविध उपाययोजना जाहीर करण्यात आल्या आहेत.

---

**खरीप हंगाम बुडाल्याने राज्य सरकारने १५ हजार ७४७ गावांसाठी ३ हजार ५७८ कोटी दुष्काळी मदतीची मागणी केंद्राकडे केल्याबाबत**

**(५०) ४९०३९ (२८-०४-२०१६). श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खरीप हंगाम बुडाल्याने राज्य सरकारने १५ हजार ७४७ गावांसाठी ३ हजार ५७८ कोटी दुष्काळी मदतीची मागणी केंद्राकडे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती सदरहू निधी वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०३-०६-२०१६) :** (१) नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.